# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२,ई, शिवाजीगर,पुणे ४११ ०१६

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com

जा. क. विकापु/लेखा-१/अर्थसं/अनुदान-खर्च/२०१७/ 1537 दिनांक :- 20.04.2017

प्रति,

संचालक,अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे
प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड/अवसरी
प्राचार्य,शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय / तंत्रनिकेतन कराड
प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन पुणे /सोलापूर /कोल्हापूर /मिरज /कराड / अवसरी /तासगाव
प्राचार्य,शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन,पुणे
प्राचार्य, म.रा.हॉटेल मॅनेजमेन्ट ॲन्ड केटरिंग टेक्नोलॉजी,पुणे

विषय :- माहे मार्च २०१७ चे मासिक खर्च विवरणपत्राबाबत
संदर्भ :- सहसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांनी दिनांक २०/४/२०१७ रोजी केलेला दुरध्वनी

वरील विषयांस अनुसरुन सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेस सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी माहे मार्च २०१७ अखेरपर्यंत लेखाशिर्षानिहाय व विविध उदिदष्टनिहाय प्रत्यक्ष प्राप्त अनुदान ,प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची व शिल्लक रकमेचे माहितीचे विवरणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहेत. त्यानुसार या कार्यालयाने सदर माहिती एकत्रित करुन संचालनालयास सादर केली. सदर माहिती मध्ये संचालनालयाने असे कळविलेले आहे की ब-याच संस्थांनी BDS प्रणालीवरील मंजुर अनुदानापेक्षा अधिक/कमी दर्शविलेली आहे. त्यामुळे शिल्लक व खर्च असलेल्या रकमांदेखील अधिक/कमी दिसून येत आहे. तरी अधिक/कमी खर्चाबाबतची सविस्तर कारणे व प्रत्यक्षात BDS प्रणालीवर अचूक मंजूर झालेले अनुदान याची माहिती दिनांक २१/०४/२०१७ रोजी ११.०० वाजेपर्यंत actt1.ropune@gmail.com या संकेतस्थळावर पाठविण्याची व्यवस्था करावी. सदरची माहिती वेळेत प्राप्त न झाल्यास व चुकीची सादर केल्यास संस्थाप्रमुख व्यक्तिश: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. सदर माहिती संचालनालयास / शासनास तात्काळ सादर करावयाची असल्याने प्रधम प्राधान्य देऊन कार्यवाही करावी

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत: प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.